आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१३ फेब्रुवारी २०२५ गुरुवार

- **<u>ठळक बातम्या</u>**
- लोकसभेत प्राप्तिकर विधेयक सादर, लोकसभेचं कामकाज १० मार्चपर्यंत स्थगित
- राज्यात अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांची १८ हजार ८८२ पदं भरणार असल्याची महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांची घोषणा
- जगभरात आज जागतिक रेडिओ दिवस साजरा
- ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ५२ सुवर्ण पदकांसह महाराष्ट्र दुसऱ्या स्थानी कायम

**आणि**

- ज्येष्ठ गायक प्रभाकर कारेकर यांचं निधन

**<><><><><>**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत प्राप्तिकर विधेयक २०२५ सादर केलं. स्थायी समितीकडे हे विधेयक पाठवायचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. प्राप्तिकराशी संबंधित कायद्यात सुधारणा करण्याच्या उद्देशानं हे विधेयक मांडलं आहे. आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नवं प्राप्तिकर विधेयक आणण्याची घोषणा केली होती. दरम्यान, लोकसभेचं पहिल्या टप्प्याचं कामकाज पूर्ण झाल्यामुळे येत्या १० मार्च पर्यंत सदनाचं कामकाज स्थगित करण्यात आलं.

वक्फ (दुरुस्ती) विधेयक २०२४ बाबतच्या संयुक्त समितीचा अहवाल आज संसदेच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात आला.  विरोधी सदस्यांनी केलेल्या गदारोळामुळे लोकसभेचं आणि राज्यसभेचं कामकाज तहकूब करण्यात आलं होतं.

<><><><><>

फ्रान्सच्या यशस्वी भेटीनंतर  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात आज पहाटे वॉशिंग्टन इथं पोहोचले. अमेरिकेतले भारताचे राजदूत विनय मोहन क्वात्रा आणि इतर अधिकाऱ्यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. राष्ट्राध्यक्षांचं अतिथीगृह असलेल्या ब्लेअर हाऊस इथं पोहोचल्यावर भारतीय समुदायानं त्यांचं स्वागत केलं.

अमेरिकेच्या राष्ट्रीय गुप्तचर विभागाच्या संचालक तुलसी गबार्ड यांनी आज वॉशिंग्टन डीसी इथं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी द्विपक्षीय गुप्तचर सहकार्य, विशेषतः दशतवादविरोधी कारवाया, सायबर सुरक्षा, उदयोन्मुख धोके आणि धोरणात्मक गुप्तचर माहितीचं आदान-प्रदान या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यावर चर्चा केली.
भारत आणि अमेरिकेचे नागरिक परस्पर हितासाठी आणि पृथ्वीच्या चांगल्या भविष्यासाठी एकत्र येऊन काम करतील असं मोदी यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यातल्या एका पोलीस शिपायाचा नक्षलविरोधी अभियानावर जाताना हृदयविकाराच्या झटक्यानं काल मृत्यू झाला. रवीश मधुमटके हे

काल संध्याकाळी भामरागड तालुक्यातल्या नक्षलवादी मोहीमेवर निघाले होते. अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना भामरागडच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. ते २०१२ साली पोलीस दलात भरती झाले होते.

**<><><><>**

येस बँक मनी लाँडरिंग प्रकरणी DHFL चे प्रवर्तक धीरज आणि कपिल वाधवान यांना आज मुंबई उच्च न्यायालयानं जामीन मंजूर केला. आरोपी प्रदीर्घ काळ तुरुंगात आहेत, तसंच या प्रकरणाची सुनावणी लवकर सुरु होण्याची शक्यता नाही. या गोष्टी लक्षात घेता, न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांच्या एकल पिठानं काल दोन्ही आरोपींना प्रत्येकी एक लाख रुपये जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला.

**<><><><>**

कोळसा उत्पादनात भारत जगात दुसऱ्या क्रमांकावर असून विकसित राष्ट्र बनण्यासाठी कोळसा उत्पादन वाढवणं गरजेचं असल्याचं केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री जी किशन रेड्डी म्हणाले. नागपूर इथं भारतीय मजदूर संघाच्या अखिल भारतीय कोळसा मजदूर संघटनेच्या अधिवेनाच्या समारोप कार्यक्रमात ते आज बोलत होते. आपल्या देशात लिथियम, कॉपर यासारख्या धातुंची कमतरता असून ते विदेशातून आयात करावे लागतात असंही रेड्डी यांनी सांगितलं.

**<><><><>**

महिला आणि बालविकास विभाग एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत ५ हजार ६३९ अंगणवाडी सेविका आणि १३ हजार २४३ मदतनीस अशी

एकूण १८ हजार ८८२ पदे भरणार असल्याची माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. मंत्रालयात महिला सहकारी संस्था, महिला बचत गट, महिला मंडळ आणि अंगणवाडीबाबतच्या विविध प्रश्नांबाबत तसचं भिवंडी शहरात अंगणवाडी केंद्रांची संख्या वाढवण्याबाबत काल बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं त्यावेळी त्या बोलत होत्या. संपूर्ण भरती प्रक्रिया पारदर्शक पद्धतीनं होणार असून उमेदवारांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडण्याचं आवाहन त्यांनी केलं.

<><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी आज आपचे नेते अरविंद केजरीवाल यांची भेट घेतली. ही भेट मैत्रीपूर्ण भेट असल्याची प्रतिक्रिया आदित्य ठाकरे यांनी दिली आहे. ठाकरे यांनी काल काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची नवी दिल्ली इथे भेट घेतली. या दोघांमध्ये निवडणूक आयोगावर ईव्हीएम संदर्भात केलेल्या आरोपांबाबत चर्चा झाली. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार दिल्याच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जात आहे.

<><><><>

जगभरात आज जागतिक रेडिओ दिवस साजरा केला जात आहे. दरवर्षी १३ फेब्रुवारी रोजी, रेडिओच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि रेडिओद्वारे माहिती मिळवण्याकरता लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी, हा दिवस साजरा केला जातो. 'रेडिओ आणि हवामान बदल' ही यंदाच्या जागतिक रेडिओ दिनाची संकल्पना आहे.

बहुजन हिताय बहुजन सुखाय या ब्रीदवाक्यासह, जगातील सर्वात मोठं रेडिओ जाळं असलेलं आकाशवाणी हे देशातील सर्व लोकांपर्यंत पोहोचणारं माध्यम असल्याचं प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सहगल यांनी म्हटलं आहे.

आकाशवाणीने स्पर्श केला नाही असा रोजच्या जीवनातला एकही पैलू नसल्याचं प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी म्हटलं आहे. तर गेल्या नऊ दशकांपासून आकाशवाणी माहिती, शिक्षण आणि मनोरंजनाच्या माध्यमातून श्रोत्यांपर्यंत पोहोचत असल्याचं आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. प्रज्ञा पालीवाल गौर यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

आजच्या काळातही अधिकाधिक श्रोत्यांपर्यंत पोहोचण्यासाठी अनेक संस्था आकाशवाणीची मदत घेत आहेत. लहान मुलांसाठी काम करणारी कलापंढरी या संस्थेनं अधिकाधिक मुलांपर्यंत पोहोचण्यासाठी स्वतःचा स्टुडियो बनवला आहे. इथे तयार केलेले कार्यक्रम धाराशिव आकाशवाणी केंद्रावरुन प्रसारित केले जातात.

**<><><><>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत आज महिला आणि पुरुष हॉकी संघांचे अंतिम सामने होणार आहेत. महिला हॉकीमध्ये मध्यप्रदेशचा सामना हरयाणाशी तर पुरुष हॉकीमध्ये महाराष्ट्राचा सामना उत्तरप्रदेशाशी होणार आहे. उधमसिंग नगर इथं आज पुरुष मलखांब प्रकारचा अंतिम सामना होणार आहे.

पदकतालिकेत सेना दल संघ ६६ सुवर्णपदकांसह अव्वल स्थानावर आहे तर महाराष्ट्र ५२ सुवर्णपदकांसह दुसऱ्या आणि हरयाणा ३९ सुवर्णपदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

इंग्लंडविरुद्धची तीन सामन्यांची एकदिवसीय क्रिकेट मालिका भारताने ३-० अशी जिंकली आहे. अहमदाबाद इथं काल झालेल्या तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात भारताने इंग्लंडचा १४२ धावांनी पराभव करून मालिका विजयावर शिक्कामोर्तब केलं. भारताच्या ३५७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडचा संघ ३५ व्या षटकांत २१४ धावांवर आटोपला.

**<><><><><>**

ज्येष्ठ शास्त्रीय गायक पंडित प्रभाकर कारेकर यांचं काल रात्री प्रदीर्घ आजारानं मुंबई इथं त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते ८० वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती खालावली होती. ‘बोलावा विठ्ठल, पाहावा विठ्ठल’, ‘मर्मबंधातली ठेव, नभ मेघांनी आक्रमिले’, ‘वक्रतुंड महाकाय’ ही त्यांची काही गाजलेली गीतं. त्यांनी आकाशवाणी आणि दूरदर्शनसाठी संगीताचे अनेक कार्यक्रम केले. ऍर्निट कोलेमन आणि सुलतान खान यांच्याबरोबर त्यांनी केलेला फ्युजन अल्बमही लोकप्रिय झाला.

१९४४ मध्ये गोव्यात जन्मलेल्या कारेकर यांनी पंडीत सुरेश हळदणकर, पंडीत जितेंद्र अभिषेकी आणि पंडीत सी. आर. व्यास यांच्याकडून शास्त्रीय गायनाचं शिक्षण घेतलं. त्यांच्या संगीत कारकिर्दीच्या सन्मानार्थ त्यांना तानसेन सन्मान , संगीत नाटक अकादमी, लता मंगेशकर पुरस्कार, गोमान्त विभूषण पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आलं होतं.

पंडित प्रभाकर कारेकर यांच्या निधनानं भारतीय शास्त्रीय संगीतातल्या वैभवशाली युगाचा अंत झाला आहे. त्यांच्या जाण्यानं शास्त्रीय संगीत क्षेत्रात एक महान तपस्वी हरपला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

**<><><><><>**

प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉन्डरिंग कायद्याचा वापर करून आरोपीला तुरुंगात ठेवल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयानं ईडी, अर्थात सक्तवसुली संचालनालयावर कडक ताशेरे ओढले असून, हुंडाविरोधी कायद्याप्रमाणे या तरतुदीचा गैरवापर होत असल्याचं म्हटलं आहे. न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती

उज्ज्वल भयान यांच्या पिठानं काल छत्तीसगडचे माजी उत्पादन शुल्क अधिकारी अरुण त्रिपाठी यांना जामीन मंजूर करताना हे निरीक्षण नोंदवलं.

<><><><><>

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सोलापूर शाखेच्या वतीने ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे यांना डॉ. वासुदेव रायते स्मृती पुरस्कार तर श्यामची आई चित्रपटातल्या भूमिकेसाठी अभिनेते माधव वझे यांना श्रीनिवास विष्णू रायते गुरुजी बालसाहित्यिक पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या १६ तारखेला पुणे साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांच्या हस्ते या पुरस्काराचं वितरण होणार आहे.

<><><><><>

शहरी भागातल्या गरजू लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचं घर मिळावं, यासाठी सर्वांनी सामाजिक कार्यकर्ता म्हणून काम करण्याची गरज आहे, असं आवाहन प्रधानमंत्री आवास योजना २चे अभियान संचालक अजित कवडे यांनी केलं.

//<><><><><>//